# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 15/06/2020 (सोमवार)
(दुपार)

### दुखापत

पो.स्टे. खापा :– अंतर्गत 25 कि. मी अंतरावर मौजा नागलवाडी येथे दिनांक 13/06/2020 चे 18:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– मारोती धोंडबाजी उईके, वय 45 वर्ष, रा. नागलवाडी यांचे घराजवळ आरोपी क्र. 1) सतिश वानखेडे हा जुगार खेळत असतांना त्याला फिर्यादीने हटकले की, 'जुगार का खेळता व येथे बसून शिवीगाळ करता, चांगले बोलत जा' असे म्हटले. या कारणावरून आरोपी क्र. 1 व त्याचा सासरा आरोपी क्र. 2) प्रेमदास सोनटक्के, दोन्ही रा. नागलवाडी यांनी फिर्यादीस शिवीगाळ करून हातबुक्याने व काडीने मारहाण करून जखमी केले

. सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. खापा येथे आरोपीतांविरुध्द कलम 323, 324, 504, 506, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक पंकज गाडगे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर